सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या समान निधी योजनेसाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक -मराग्रं-२०१८/प्र.क्र. १२६/२०१८/साशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २०१९.

वाचा : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि. ०२.०४.२०१८.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२०१८/प्र.क्र.१२६/२०१८/साशि-५, दि.१८.०८.२०१८.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२०१८/प्र.क्र.१२६/२०१८/साशि-५, दि.०२.०१.२०१९
४.शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि. २५.०१.२०१९.
५) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२०१८/प्र.क्र.१३९/२०१८/साशि-५, दि.०२.०२.२०१९.
६) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.५२ /निधी वितरण/२०१८-१९/१८११८-१९, दि.०२.०२.२०१९.
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३,दि. ०८.०३.२०१९.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांचे अंशदान आणि राज्य शासनाचे अंशदान यांच्या संयुक्त सहभागाने ५०:५० या प्रमाणातील निधीमधून राबविण्यात येणारी योजना ही समान निधी योजना म्हणून कार्यरत आहे. संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन निर्णयान्वये राज्य शासनाचे अशंदान रु. २.५० कोटी वितरित करण्यात आले आहे. संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये सदर समान निधी योजनेसाठी राज्य शासनाच्या अशंदानात रु.२.५० कोटी वरुन रु. ३.०० कोटी पर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यानुषंगाने ग्रंथालय संचालनालयाच्या संदर्भ क्र. ६ येथील प्राप्त प्रस्तावास अनुसरुन रु. ५०.०० लाख वितरित करुन खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता, च्या समान निधी योजनेसाठी सन २०१८-१९ करिता राज्य शासनाचे अंशदानासाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीतील उर्वरित ५० लाख निधी ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना वितरीत करुन खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. वित्त विभागाच्या दि. ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अटींची पूर्तता होत आहे. वित्त विभागाच्य संदर्भाधीन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे. सदरचा खर्च करण्यासाठी ग्रंथालय संचालक,ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई यांना आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. हा निधी मागणी क्रमांक डब्ल्यू-४, २२०५-कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये, (०३) मध्यवर्ती जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य, (०३) (०२) राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानासाठी अंशदान (अनिवार्य) (२२०५ ०३०४) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली चालू वर्ष २०१८-१९ करीता उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा. तसेच या अनुदानाच्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे ग्रंथालयांनी विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १३७/१९/ व्यय-५ दि.०७.०२.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०३१९१७२९००४१०८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2019.03.19 17:30:30 +05'30'

(अनिल वि.सावरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर
३. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४. ग्रंथालय संचालक,ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई.
५. ग्रंथपाल, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय,मुंबई. (ग्रंथालय संचालनालयांमार्फत)
६. सचिव (उ.व.तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक
७. कक्ष अधिकारी, साशि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती,साशि-५, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.